**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर- ३१९०/२०२३**

**अपिलार्थी, श्री.सुरेंद्रसिंह अजितसिंह नेगी,**
०५, रुपादेवी सोसायटी, रोड नं.२२,
MSEB पोल नं.१३ जवळ, सावरकर नगर,
ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०६.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे,
महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग,
चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधक्षिक,
नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे,
महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग,
चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १३.०८.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १९.०६.२०२३ | -- | २७.०७.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १३.०९.२०२३ रोजीच्या अर्जान्वये *" कसल्याही प्रकारची माहिती दिली नाही "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १३.०८.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सोपान भाईक, सहाय्यक आयुक्त यांचे प्रतिनिधी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जयनाथ माळी, कार्यालयीन अधीक्षक, नौपाडा प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुहास वसंतराव राणे, उप अभियंता, शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" राम मारुती रोड, नौपाडा, ठाणे येथील हॉटेल शिवा प्रसाद व शिव समर्थ इंग्लिश माध्यम शाळा या दोघांना मोठा नाल्यावर प्रकल्प उभारण्याची परवानगी ठाणे महानगरपालिकेच्या कोणत्य विभागाने दिलेली आहे आणि हा प्रकल्प वैध आहे का? नाल्यावर उभारलेल्या हॉटेलचे व शाळेचे फोटो तुमच्या माहितीसाठी जोडत आहोत. या हॉटेल शिवा प्रसाद व शिव समर्थ इंग्लिश माध्यम शाळा बांधकामाचे संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकित प्रत प्रमाणित करुन द्यावी."*

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांनी सदर माहितीचा विकास प्रस्ताव नमूद न केल्याने त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे त्यांना दि.०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि तत्कालीन वास्तुविशारदांकडून विकास प्रस्ताव घेऊन माहिती काढण्यात आलेली आहे व ती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२५ .

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ